773

ISBN No: 978-81-907287-8-2

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत
गांधी एज्यूकेशन सोसायटी, कुंडलचे

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

ता. पलूस, जि. सांगली

अर्थशास्त्र विभाग आयोजित




# शिवार्थी

स्मरणिका
२०१८



१) सहकारी अर्थकारण- काल, आज आणि उद्या

२) पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान

शिवाजी युनिव्हर्सिटी
इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर (सुयेक)

२८ वे

## वार्षिक अधिवेशन

शुक्रवार दि. ०५ जानेवारी व ०६ जानेवारी २०१८

SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

774

# अनुक्रमणिका


- सहकार- जागतिकीकरणातील दीपस्तंभ
  - डॉ. विजय ककडे (०१)
- भारतातील सहकारी चळवळीसमोरील निश्चलनीकरणाची आव्हाने
  - डॉ. अनिल वावरे आणि प्रा. किशोर सुतार (०४)
- महाराष्ट्राच्या ग्रामीण आर्थिक विकासात सहकार चळवळीचे योगदान
  - डॉ. सौ. एम्. बी. माळगे (१६)
- Role of Primary Agricultural Co-operative Society (PACS) in Agricultural Development
  - Dr. Ashok Jadhav (23)
- माणदेशातील सहकारी चळवळीतील अग्रगण्य बँक 'दी बाबासाहेब देशमुख सहकारी बँक लि., आटपडी
  - डॉ. सौ. तेजस्विनी मुढेकर आणि प्रा. हणमंत सावंत (२८)
- सहकार पुनरुज्जीवन: काळाची गरज
  - डॉ. सौ. सुनिता राठोड (३५)
- Role of Dairy Co-operative in Indian Economy
  - Dr. M. S. Deshmukh & Prof. Tanaji Ghagare (42)
- Difficulties Before Co-operative
  - Dr. Sujata Patil (51)
- Ethanol Production in Sugar Co-operative
  - Prof. Sanjay Omase (56)
- Urban Co-operative Banks: Issues & Prospects
  - Dr. Pravin Babar (62)
- A Study of Water Management Lift Irrigation Schemes in Sangli Dist. A Comparative Study of Palus & Tasgoan Taluka
  - Prajakta Lad & Dr. Pratap Lad (70)
- Problems of Co-operative Sugar Industry in Maharashtra
  - Dr. Tukaram Rabade (81)
- ग्रामीण विकासातील सहकारी पतपुरवठ्याचे महत्त्व
  - डॉ. टी. एम्. भोसले (८७)



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI

Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI.

# महाराष्ट्राच्या ग्रामीण आर्थिक विकासात सहकार चळवळीचे योगदान

**डॉ. एम्. बी. माळगे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली

**प्रस्तावनाः**

विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची गुजरात व महाराष्ट्र अशी विभागणी होऊन महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. भारतातील एक अग्रेसर व पुढारलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ख्याती आहे. महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७६९० लक्ष हेक्टर इतके असून त्यापैकी १७.२६ टक्के जमीन ही जंगल व्याप्त आहे. राज्यामध्ये विविध वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. १९९१ नंतर औद्योगिक उत्पादनाच्या स्वरूपात बदल घडून आला असून उपभोग्य वस्तूच्या उत्पादनाबरोबर रसायने, विद्युत उपकरणे ,यंत्रे, संगणक ,औषधे ,रबर, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी भांडवली वस्तूचे उत्पादन देखील वाढत आहे.परंतु आज महाराष्ट्र देशातील प्रगत व पुरोगामी राज्य असले तरी राज्याचा ग्रामीण विकास म्हणावा तसा झाला नाही. मुलगामी परिवर्तनाचा प्रभाव कोरडाच आहे.महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अद्यापी ग्रामीण आहे. राज्याची ६१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात रहात असून ती ४३०२७ खेडयातून व ४००९२ वस्त्या वाडयातून वसली आहे.त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचा विकास झाल्याशिवाय महाराष्ट्राचा खऱ्या अर्थानी विकास होणार नाही. भारताच्या आणि महाराष्ट्राचा ग्रामीण विकासात सहकार चळवळीचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. महाराष्ट्राला ग्रामीण विकासासाठी सहकार चळवळी शिवाय पर्याय नाही. सध्या जागतिक पातळीवर खाजगीकरणाचे वारे



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

वाहत असले तरी ग्रामीण विकासात खाजगीकरणाचे योगदान महत्त्वाचे ठरेल असे वाटत नाही , कारण भारतात सहकार चळवळीची सुरूवात शेती कर्जपुरवठ्याची समस्या सोडवण्याच्या हेतूने करण्यात आली. नियोजन काळात सहकार चळवळ आर्थिक विकासाचे माध्यम म्हणून स्वीकारण्यात आले. महाराष्ट्र हे आर्थिक औद्योगिक शैक्षणिक राजकीय सांस्कृतिक अशा अनेक बाबतीत एक प्रगत विकसित राज्य आहे, त्यामुळे महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासात सहकार चळवळीचा फार मोठा वाटा आहे. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र सहाकारी चळवळ संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या विकासीत झालेली आहे. महाराष्ट्रात सहकार चळवळीने वेगवेगळ्या क्षेत्रात केलेली प्रगती व महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे असे मत मांडण्याच्या दृष्टिने शोधनिबंधाचा हा विषय निवडला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टेः

२.भारतीय अर्थव्यवस्थेतील सहकार चळवळीचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, बाध्दिक, शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्व अभ्यासणे.

३.भारतातील सहकार चळवळीत अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकार चळवळीचे महत्व व समस्या अभ्यासणे.

४.महाराष्ट्राचा ग्रामीण विकास करण्यासाठी सहकार चळवळ जेवडे उपयुक्त आहे तितके खाजगीकरणाचे योगदान महत्त्वाचे ठरणार नाही.

५.आधुनिक काळात महाराष्ट्राच्या निर्मितीत आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहकार चळवळ करण्याची गरज आहे याबाबत चर्चा करणे.

६.नव्या आर्थिक धोरणाच्या स्वीकारामुळे सहकार चळवळीपुढील आव्हांनाचा आढावा घेणे.

गृहीतके

१. सहकाराला पर्याय नाही पण भविष्याचा वेध सिध्दांताची दखल घेऊन तशी पावले उचलण्यासाठी सहकार चळवळीचे महत्त्व तसेच सामाजिक न्याय मिळवून देण्याचे आव्हान विकासाचे आव्हान मोलाचे आहे.

२. सहकार चळवळीच्या माध्यमातूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या समस्यांची सोडवणूक करणे ,आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा जलद विकास साधणे शक्य आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्राच्या विकासात सहकार चळवळीची कामगिरी आणि भविष्यकालीन अपेक्षा या विषयांचे सखोल चिंतन करून विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर शोधनिबंध लेखनासाठी तज्ञ लेखकांच्या संदर्भग्रंथाचा व विविध नियतकालिकांचा आधार घेतला आहे.

**महाराष्ट्राचा ग्रामीण विकास : संकल्पना वास्तव स्थिती**

ग्रामीण विकासाची सर्वमान्य व्याख्या करणे कठीण आहे तथापि रॉबर्ट चेंबर्स म्हणतात की Rural development is a strategy to enable a specific group of people pore rural women



SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya

and men to gain for themselves and their children more of what they want and need it involves helping the poorest among those who seek a live hood in the rural areas demand and control more of the benefits of the rural development . The group includes small scale farmers tenants and landless.

Robert Chambers (Ruler development: Putting the last first) (London Longma,1983)

ग्रामीण विकासाची संकल्पना जशी विविधांगी आहे त्याचप्रमाणे ग्रामीण विकासाच्या समस्यादेखील विविधांगी आहेत. राज्यातील ग्रामीण विकासाच्या कार्यामुळे ग्रामीण भागाची काही प्रमाणात आर्थिक प्रगती झालेली आहे हे जरी खरे असले तरी ग्रामीण भागाची गुणात्मकदृष्ट्या प्रगती झालेली नाही. ग्रामीण भागातील समस्या काही प्रमाणात कमी झाल्या असे वाटत असले तरी ती वस्तूस्थिती नाही. ग्रामीण विकासाच्या बऱ्याच समस्या आहे तश्याच आहेत. उदा. दारिद्र्य विषमता बेरोजगारी इत्यादी उलट यामध्ये काही नवीन समस्यांची भर पडत आहे. यामध्ये प्रामुख्याने पर्यावरण प्रदूषण शेती क्षेत्राच्या प्रती ग्रामीण लोकांची उदासीनता शहरी भागाचे अतिक्रमण भौतिक सुखांची चटक कामचुकारपणा इ.उल्लेख करता येईल त्यामुळे ग्रामीण विकासाच्या समस्येकडे आर्थिक सामाजिक मानसशास्त्रीय सांस्कृतिक अशा विविध दृष्टिने या समास्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे .याकरिता ग्रामीण विकासाच्या नवीन कार्यक्रमाची आखणी करून किंवा योजना कार्यक्रमाची संख्या वाढविण्याची गरज नाही आहे ते कार्यक्रम योजना प्रामाणिकपणे व अधिक कार्यक्षमतेने राबबण्याची गरज आहे म्हणून ग्रामीण विकासाचे कार्यक्रम व योजनाचे रूपांतर चळवळीत झाले तर ते अधिक प्रामाणिकपणे राबविण्याची क्षमता ही सहकार चळवळीत असल्याचे दिसून येते. देशातील प्रगत घटकराज्य म्हणून महाराष्ट्राचा विचार करताना शेती व उद्योगधंदे यांच्या प्रगतीचा विचार करावा लागतो. राज्याचा ग्रामीण विकास हा सर्व जिल्हयाचा व राज्यातील जनतेचा विकास असतो. नियोजन प्रक्रियेचा भाग म्हणुन १९६० पासून महाराष्ट्र राज्यात अनेक उद्योग स्थापन करण्यात आले. सहकारी संस्था प्रत्येक राज्यात उभ्या राहिल्या सहकाराच्या विकासामुळे मुंबई पुणे पश्चिम महाराष्ट्र इ. विभागांची सरशी झाली तर विदर्भ मराठवाड्यात ग्रामीण विकासाचा वेग मंदावला. आजही राज्यातील ८४ तालुके दुष्काळी आहेत. इतकेच नव्हे तर राज्याच्या प्रत्येक जिल्हयात सुध्दा विभागीय असमतोल आहे. उदा. सांगली जिल्हयातील जत आटपाडी व सोलापुर जिल्हयातील अक्कलकोट मंगळवेढा सांगोला तर कोल्हापुर जिल्हयातील आजरा चंदगड भुदरगड हे तालुके कायम दुष्काळी आहेत म्हणजेच स्वातंत्र प्राप्तीनंतरही राज्यात विकासाच्या अनेक योजना राबवल्या तरी त्यातून विभागीय असमतोल व ग्रामीण भागाच्या मुलभूत समस्या सुटल्या नाहीत हे वास्तव चित्र आपणास नाकारता येणार नाही. इतिहासाचा समर्थ वारसा घेऊन भारतीय स्वातंत्र्याची वाटचाल १९४७ पासून सुरू झाली. सन १९४७ ते २०१७ हे भारतीय स्वातंत्र्याच्या सत्तराव्या वर्षी थोडेसे मागे वळून पाहिले असता भुतकाळ आणि भविष्यकाळ यातील एक अभूतपूर्व असा समन्वय आणि सुवर्णमध्य आपणास पहावयास मिळेल. देश पातळीवर आणि राज्य पातळीवर सहकारी चळवळीच्या कामगिरीचा सुवर्णमध्य ग्रामीण विकास हाच आहे. ग्रामीण विकास ही संकल्पना अधिक व्यापक आहे. स्थूल मानाने असे म्हणता येईल की नैसर्गिक व मानव साधन संपत्ती तंत्रशास्त्र पूरक सोयी सेवा संस्था व संघटना सरकारी निती व कार्यक्रम यांचा वापर ग्रामीण आर्थिक वाढीस उत्तेजन मिळून या लोकांना रोजगार पुरवणे त्यांचे जीवनमान



SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya

उंचावणे या उद्देशाने करणे म्हणजे ग्रामीण विकास होय. ग्रामीण विकास म्हणजे फक्त आर्थिक विकास नसून ती सामाजिक व संघटनात्मक प्रक्रिया असू शकते.खेडुतांचे उत्पन्न वाढताना त्यांना पुरेशा शैक्षणिक व आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. ग्रामीण भागात सर्वे सुखिना संतू सर्वे संतू निरामय ही स्थिती होय.

**ग्रामीण विकासात सहकारी चळवळीचे महत्व**

आज भारतातील सर्व राज्यात सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचे स्थान अग्रेसर आहे. सहकारच्या माध्यमाने महाराष्ट्रने अनेक क्षेत्रात अभुतपुर्व प्रगती केली आहे.स्वातंत्र्य प्राप्ती नंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा जो काही विकास झाला आहे त्यामध्ये सहकारी चळवळीचा वाटा मोलाचा ठरतो. राज्यातील सहकार चळवळीची प्रगती उल्लेखनीय असून पश्चिम महाराष्ट्रचे अनुभव राज्यास प्रेरणादायी ठरतील असेच आहेत. सहकारी पतपुरवठा संस्था सहकारी खरेदी विक्री संस्था,दुग्धसहकारी संस्था गृह निर्माण संस्था, सहकारी साखर कारखाने इ. संस्थाने राज्यात आर्थिक सामाजीक व शैक्षणिक क्षेत्रात प्रगती केली आहे. सहकारने राज्यात मोठया प्रमाणात रोजगार निर्माण करून ग्रामीण विकासात बहूमोल कामगीरी बजावली आहे. म्हणुनच असे म्हनावे लागेल की '' विना सहकार नही ग्रामोव्दार' महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकारी चळवळीचीचे योगदानाची कारण मिमांसा पुढील प्रमाणे

१.सहाकार चळवळ आणि शेती विकासः अद्यापही महाराष्ट्राच्या ग्रामीण क्षेत्रात साठ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या राहते. त्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. दुबार पीक घेण्याबाबत राज्याचा भारतात आठरावा क्रमांक आहे. ऊस वगळता सर्व शेती उत्पादनात महाराष्ट्राची हेक्टरी उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. खतांचा वापर कमी आहे. परंतू स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळीच्या माध्यमाने महाराष्ट्राने शेतीचा विकास घडवून आणला आहे. शेतीमध्ये संस्थात्मक विकास घडवून आणला आहे. जमीनधारक विषयक अनेक प्रगतशील कायदे महाराष्ट्राने देशात प्रथम करून शेतीचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच शेतीविषयक तांत्रिक सुधारणा केल्या आहेत. यामध्ये सुधारित तंत्र व अवजारे, सुधारित बि बियाणे, खते, कीटकनाशके पाणीपुरवठा इत्यादीचा समावेश होतो. महाराष्ट्रात अन्नधान्याच्या विकासाप्रमाणे फळा फुलांची लागवड शेती वाढत आहे.यासाठी सहकारी चळवळीने केलेली मदत महत्वाची आहे.सहकारी चळवळीच्या माध्यमाने कृषी पुरवठा शेती आदिवासी विकास पणन प्रक्रिया सूतगिरण्या साखर कारखाने दुग्ध व्यवसाय कुक्कुटपालन रेशीम उद्योग औद्योगिक प्रक्रिया इत्यादी अनेक क्षेत्रात सहकारी संस्था पोहचल्या आहेत.राज्यातील एकून रोजगारात सहकारी क्षेत्राचा वापर १२.५ टक्के आहे.सहकारी चळवळीने ग्रामीण क्षेत्रातील सावकारशाही नष्ट केली आहे.सहकार क्षेत्राने वित्तपुरवठा मक्तेदारी निर्माण केल्याचे दिसून येते. शेतीसाठी अल्पकालीन मध्यम व दीर्घमुदतीचे कर्ज दिले जाते.राज्यात अनेक कृषी विद्यापीठे कृषी महाविद्यालये शेतीशाळा स्थापन करून शेती विकासाला चालना दिली आहे.राज्याच्या ग्रामीण क्षेत्राच्या विकासात सहकारी चळवळीचे योगदान किती महत्वाचे आहे हे दिसून येते.

२. साखर उद्योग सहकारी चळवळः सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचे केलेले महात्वाचे कार्य म्हणजे साखर कारखाने होय. सहकारी चळवळींच्या माध्यमाने केलेली प्रगती पाहून हजारो गरीब सभासदांच्या शेअर्सच्या भांडवलाने चालणारे हे उद्योग पाहून अनेक विदेशी विचारवंताना आश्चर्य वाटले आहे. सहकाराच्या माध्यमाने या साखर कारखान्यामुळे हजारो गरीब शेतकऱ्याच्या प्रगतीस चालना मिळाली. मूठभर श्रीमंत लोकांची

Principal, S.M.G. Kanya Mahavidyalaya SANGLI.

मक्तेदारी संपुष्टात आणली.सध्या देशातील एकूण २५२ सहाकारी साखर कारखान्यापैकी महाराष्ट्रात ११२ कारखाने आहेत.या साखर कारखान्यानी आपल्या क्षेत्रातील ऊसाची लागवड रसायन उद्योग वाहतूक व्यवसाय शेती यंत्रसामग्री सहाकारी बँका इत्यादी अनेक व्यवसायांना चालना दिली आहे.कारखान्यातील सभासदापैकी ९३ टक्के सभासद शेतकरी आहेत.यावरून ग्रामीण विकासातील सहाकाराचे योगदान किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. साखर कारखान्यांना लागणारे मोठे वित्तीय साहाय्य राज्य राज्य सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बॅका देतात.गेल्या काही वर्षात सहाकारी साखर कारखान्यांनी अनेक उत्पादनाचे व कार्याचे विविलीकरण केले आहे.कृषी औद्योगिक प्रल्पप अनहायडाइड पोटॅश ॲसोटोन ऑक्सालिक ॲसिड कागद निर्मीती उपसा जलसिंचन योजना रस्ते व घरबांधणी इस्पीतळे व आरोग्य शिबीरे शाळा महाविद्यालय इजिनिअरींग कॉलेजेस फळबागा लावणे नागरी सहाकारी बँका चालवणे दुध व्यवसाय कुकूटपालन इ.विविध व्यवसाय निर्माण केले आहेल.ज्यामुळे ग्रामीण भागातील अनेक लोकांना रोजगार मिळाला आहे.स्वयंरोजगार निर्मीतीस चालना प्रोत्साहन मिळून ग्रामीण विकासास मदत झाली आहे.

३. सहाकारी चळवळ आणि दुग्धव्यवसायः प्राचिन काळापासून दुग्धव्यवसाय हा सुपरिचीत आहे.परंतु या व्यवसायाला अवकळा आली होती. अलीकडे सहाकाराच्या माध्यामातून हा व्यवसाय भरभराटीस आला आहे.ग्रामीण क्षेत्रातील लहाण शेतकरी शेतमजूर यांना उदरनिर्वाचे साधन पुरवण्याचे कार्य या व्यवसायाने केले आहे.सध्या महाराष्ट्रातील अनेक खेडयात दुध सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत. काही खेडयात २/३ दुधसंस्था स्थापण झाल्या आहेत.दुग्धव्यवसायाच्या विकासात महाराष्ट्राचे स्थान अव्वल आहे.अनेक जिल्हयात सहाकारी दुग्ध योजना राबवल्या जातात.दुध संकलन केंद्रावरून दुध गोळा केले जाते.स्थानिक गरज भागवल्यानंतर उर्वरीत शहरात वाटप केले जाते. शिल्लक दुधापासून दुध भुकटी लोणी तुप बनवले जाते. शन १९७१ नंतर दुधाचा महापुर हा प्रकल्प राज्यात सर्वत्र राबवला गेला. जनावरांची चांगली पैदास सकस आहार मिळाव आरोग्य सूधारावे यासाठी अनेक योजना आखल्या गेल्या. दुग्ध व्यवसायात गरिब शेतकाऱ्यांचा सहाभाग वाढविण्यासाठी सहाकारी संस्थांना प्राधान्य देण्यात आले.या कार्यक्रमास 'धवलक्रांतीम असे नाव देण्यात आले.दुधाचा महापुर या योजनेत लोखो शेतकऱ्यांना जोड धंदा प्राप्त झाला. अलिकडे महाराष्ट्रातून आंध्र बंगाल बिहार दिल्ली येथे दुध पाठवले जाते.अनेक देशांना दुध भुकटीची निर्यात होते.हि धवलक्रांती सहाकारी चळवळीने यशस्वी झाली. अनेक गरिबांना उदरनिर्वाहासाठी जोड धंदा मिळाला.त्यांचे जिवन सूसहय झाले.या व्यवसायाने ग्रामीण विकासाला मोलाची भर घातली आहे.

४. शिक्षणाचा विकास सहकारी चळवळः ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा विकास करण्यास सहाकारी चळवळीचा मोठा कार्यभाग आहे यात शंका नाही.अनेक साखर कारखान्यांनी आपल्या क्षेत्रात शाळा महाविद्यालये चालवून ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार केला आहे.हि महाविद्यालये या कारखान्यांनी चालु केली नसती तर बहूसंख्य ग्रामिण युवक युवती शिक्षणापासून वंचित राहिली असती.शहारात जाऊन शिक्षण घेणे परवडले नसते.भोगावती शाहूनगर वारणानगर प्रवरानगर येथील संस्थांनी ग्रामीण क्षेत्रात उत्कृष्ट शैक्षणिक कार्य केले आहे.प्रवरानगर व कृष्णा सहाकारी साखर कारखाना यांचा वैद्यकिय महाविद्यालय राजारामबापू साखर कारखाना साखराळे आणि सांगलीच्या वसंतदादा साखर कारखान्यांची इजिनीयरिंग



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

कॉलेजेस यांनी ग्रामीण क्षेत्रातील लायक विद्यार्थ्यांना संधी निर्माण करून दिली आहे.महागडया आरोग्याच्या सोयी ग्रामीण भागातील जनतेला अल्प खर्चात देण्याचा प्रयत्न केला.उदा.कराडचे कृष्णा चारिटेबल हॉपिटल या सर्व गोष्टी सहकाराने साध्य झाल्या आहेत.

५. रामाजिक बांधिलकी आणि सहकारी चळवळः- महाराष्ट्रातील सहाकारी चळावळीने सामाजीक बांधिलकी माणून अनेक कार्ये ग्रामिंण भागात केली आहेत.ग्रामीण क्षेत्रात निर्माण झालेल्या साखर कारखानदारीने याच हेतूने आपल्या परिसरात रस्त्यांसारख्या मुलभूत सेवा उपलब्ध केल्या. अनेक गाबातील पांदीचे रूपांतर पक्क्या रस्त्यांमध्ये करून बारामाही बाहतूक व्यवस्था उपलब्ध करून दिली. काही ठिकाणी छोटे पुल उभारले.काही ठिकाणी उपसाजल सिंचन योजनांना कर्जपुरवठा केला.विशेषतः कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधून शेती व्यवस्थापणाला बारमाही पाणीपुरवठा होईल याची दक्षता घेतली.हंगामाच्या काळाात वीज उत्पादन करून उर्जेची बचत केली.अनेक सहकार्य क्षेत्रातील कारखान्याची विविध शैक्षणिक सुविधा परिसरातील लोकांना उपलब्ध करून दिल्या आहेत.सहकार्य चळवळीच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या संस्थांनी परिसरातील जनतेसाठी अनेक सामाजिक उपक्रम सुरू केले आहेत.अनेक ठिकाणी याच उद्देशाने जनता बाझार सुरू केले आहेत. त्यामुळे जनतेला विविध प्रकारच्या चांगल्या दर्जाच्या वस्तू योग्य किंमतीत उपलब्ध व्हाव्यात.विविध आरोग्याच्या सोयी अल्प खर्चात उपलब्ध करून देतात.त्यासाठी हॉस्पीटल बांधतात.तज्ञ डॉक्टरांची नेमणूक केली जाते.काही वेळा विविध शिबिरे करावली जातात. अनेक साखर कारखाने सामुदायिक विवाह समारंभ पार पाडतात.नवविवाहीत जोडप्यांना कारखान्यातर्मे संसार उपयुक्त वस्तू भेट म्हणून दिल्या जातात.महाराष्ट्रात सहकार्य चळवळीच्या माध्यमातून जे उद्योग निर्माण झाले आहेत यातून समाजहिताची भावना निर्माण झाली. महाराष्ट्राच्या सहाकार्य चळवळीला जे खंबीर व गतीमान नेतृत्व लाभले त्यामध्ये जी.के.देवधर चुनलिल मेहता वैकुंठभाई मेहता द.मा.कर्वे रमणभाई सरैय्या विठ्ठलराव विखे पाटील धनंजयराव गाडगीळ यशवंतराव चव्हाण वसंतदादा पाटील बाळसाहेब देसाई यशवंतराव मोहिते रत्नाप्पा कुंभार तात्यासाहेब कोरे इ.अनेक समाज सुधारकांचा समावेश होतो.आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून सहाकार्य उद्योगातून निर्माण झालेला नफा घरी न घेऊन जाता किंवा सभासदांना लाभांशाच्या रूपाने न वाटता समाजाच्या उपयोगी विबिध बार्बीबर खर्च केला जातो म्हणुनच महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकार्य चळवळीचे योगदान मोलाचे ठरले आहे भविष्यातही तेच महत्वाचे ठरेल.

**सहाकारी चळवळीतील काही दोष**

सहकारी चळवळ निकोप नाही सहाकारी चळावळीतील हे दोष दुर केल्यास कायदयाची योग्य आमलबजावणी केल्यास कडक कायदे केल्यास काही दोष कमी होण्यास मदत होणातआहे . त्यापैकी काही दोष खालील प्रमाणे.

१. अद्यापही राज्यातील बहूसंख्य लोकांना तत्वाचे योग्य ज्ञान नाही.

२. सहाकारी चळवळीला निस्वाःर्थी नेत्वृत्व लाभत नाही.काही अपवाद वगळता गरिबांन विषयी कनव नसते.स्वार्थी प्रवृत्तीने संस्थेच्या पैशाचा दुरूपयोग केला जातो.



GARWARE KANYA SANGLI MAHAVIDYALAYA SMT MATHU
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya

३. सहाकारात राजकारणाचा दुर्देवाने प्रवेश झाला आहे.सहकारी चळवळीचे नेतृत्च गावातील श्रीमंत लोक जमिनदार पोलिस पाटील यांच्याकडे असते.

४. महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा समानविकास झालेला नाही.पश्चिम महाराष्ट्रात तिचा अधिक विकास पण कोकण मराठवाडा विदर्भ येथे तिचा फारसा विकास झालेला नाही.

५. सहाकारी चळवळीतील सर्व प्रभावी स्थाने कारखान्याचे अध्यक्ष पद आमदार पद खासदारकी मंत्री पद इ.एकाच कुटूंबातील व्यक्तीकडे असतात हा योगायोग नाही.

६. राज्याच्या ग्रामीण भागात जनतेतील आंधश्रद्या धार्मिक रूढी परंपरांचा प्रभाव जातीयतता इ्र कारणाने सहाकारी चळवळीच्या वाढीला योग्य परस्थिती नसते.

७. वाढती थकबाकी ही फार मोठी समस्या सहाकारी चळवळीसमोर निर्माण झाली आहे.

**सारांश**

नव्या आर्थिक धोरणाच्या स्विकृती मुळे ग्रामीण आर्थिक विकासात सहकारी चळवळीला जे पुर्वी स्थान होते कायदयाने किंवा अनेक सवलीमुळे ज्या संधी होत्या त्या निश्चितच संपुष्टात आल्याचे दिसून येते म्हणून सुसज्ञता निर्माण केल्याशिवाय पर्याय नाही.आज ग्रामीण विकासात सहकारी संस्थाचे स्थान काय असणार या विवेचनावर सर्वजन अडकलेले दिसतात.गावपातळीस संस्थेचा सचिव सहकारी बँकेचा वरिष्ठ निरीक्षक खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सर्व जन चिंता ग्रस्त आहेत .परंतू येवढे चिंताग्रस्त होण्याचे कारण नाही जरी केंद्रसरकारने खाजगी कारखानदारांना उत्तेजन पर सवलती दिल्या असल्यातरी ही आणि सहकारी साखर कारखानदारांना जो नफा मानला जाणार जो खाजगी कारखानदारांच्या बाबतीत उत्पादन खर्च जरी मानला जानार असला तरीही सहकारी चळवळीने न डगमगता काळाची पाऊले ओळखून मुकाबला करणे आवश्यक आहे.आत्मनिर्भर झालेच पाहीजे. व्यवस्थापण शास्त्रीय पध्दतीने करणे आवश्यक आहे.ग्रामीण विकासात सहकारी चळवळीचे योगदान खुप महात्वाचे राहाणार आहे. फक्तपरिस्थितीजन्य बदल करून आधुनिकी करून सामोरी जाण्याची तयारी ठेवायला हवे हेच वास्तव.

Co-opetatives must becomes dynamic and robust to take up the view responsibilities coming ahead in rural economic development Rural development need Co-oprative and Co-operative need Rural Development.

**संदर्भ ग्रंथ**


१. कामात गो.स.सहाकार तत्व.व्यवहार आणि व्यवस्थापण श्री. विद्या प्रकाशन पुणे द्विtीय आवृती १९७९

२. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात २००२ सहकार आयुक्त व निबंधक सहकार संस्था महाराष्ट्र राज्य पुणे १

३. सहाकारी महाराष्ट्र नोव्हेंबर डिसेंबर २००४ वर्ष४४ वे अंक १ व २ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे

4. Winfired a John and Kulandaiswamy V History of Co operative thought rainbow publication Coimbatore , First Edition-1980

5. Sharada V. the theory of Co operative Himalaya Publication house Bombay First Edition 1989.




SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

Criteria III 2018-19 782

ISBN No. : 978-81-907287-8-2

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत

वुईनेन्स एज्युकेशन सोसायटी, सांगलीचे

## श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.

अर्थशास्त्र विभाग आयोजित

## शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापुर. (सुयेक)

# २९ वे वार्षिक अधिवेशन




विषय :

१) आरोग्याचे अर्थशास्त्र- २४ डिसेंबर २०१८

२) वित्तीयक्षेत्र सुधारणा- काल, आज आणि उद्या- २५ डिसेंबर २०१८

# शिवार्थ

अंक : १८ वा / डिसेंबर २०१८

Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

783


♦ Importance of Health Insurance: Issues and Challenges .... Dr. Mrs. APTE R. D. १३४

♦ Child Malnutrition In India .............................................. Miss Ankita Rajesh Tiwari १४०

.............................................................................. Dr Shakuntala Patil

♦ A Study on Health Expenditure in India ........................... Mrs. Swati P. Hake १४६

♦ An Analytical Study of Mahatma Jyotiba Phule Jan Arogya Yojana १५२

.............................................................................. Dr. R. D. Jeur

.............................................................................. Mr. Bhasme Ashish

**विषय : वित्तीय क्षेत्र सुधारणा : काल, आज आणि उद्या** १६१

♦ आभासी चलन (क्रिप्टो करन्सी)चा वापर व भारतीय बँकीग व्यवसाय ....... प्रा. डॉ. विजय मारूती कुंभार १६३

♦ भारतातील बँकिंग क्षेत्रातील सुधारणा........................................ प्रा.डॉ. कबीर पांडुरंग वाघमारे १७२

♦ भांडवल बाजाराच्या विकासात बँक व्यवसायेतर

वित्तीय कंपन्या/मंडळे भुमिका ................................................... Dr.V.A. Patil, १७८

Shri.P.P. Dange

♦ भारतीय बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हाने ........................................ डॉ. रमजान फत्तुखान मुजावर १८२

♦ भारतीय बँकीग व्यवस्थेचे महत्व, अडचणी व सुधारणांचा अभ्यास........... श्री. चंद्रकांत विनायक भोसले १८८

♦ नरसिंहम सामिती अणि वित्तीय क्षेत्रातील सुधारणा ........................... श्री. संजय मारूती पाटील १९७

.............................................................................. श्री. विकास केशव खामकर

♦ भारतातील बँकिंग व्यवसाय: अडथळे व उपाययोजना......................... डॉ. एम.एस.सुर्यवंशी

.............................................................................. प्रा.बी.जी.कोरे (सेवानिवृत्त) २०२

♦ बँकींग क्षेत्रात उत्कृष्ठ दर्जाची ग्राहक सेवा काळाची गरज ....................... प्रा.डॉ.मंगल भास्कर माळगे २०९

♦ Banking Sector in Indiareforms Period ............................ Dr. K. R. Tanange २१६

Prof. Dr. P. S. Kamble

♦ Important Role of Financial Inclusion For

The Growth of Indian Economy ......................................... Dr. Sujata J. Patil २२८

♦ A Study of Financial Inclusion in India After 1991 ........... Amit B.Patil २३३

♦ सुयेक २९ वे वार्षिक अधिवेशन श्रीमती म.ग.कन्या महाविद्यालय, सांगली

संयोजन समिती (कार्य विभागणी).................................................................२३९





SMT MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI

Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI.

784

# बँकींग क्षेत्रात उत्कृष्ठ दर्जाची ग्राहक सेवा काळाची गरज

**प्रा.डॉ.मंगल भास्कर माळगे**
श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.
मोबा नं. ९४२११३३६४८.

**प्रस्तावना :**

नवीन आर्थिक धोरणानंतरच्या (१९९१नंतर) काळात भारतातील बँकिंग क्षेत्रांचा जनसामान्यापर्यंत पोहचणाऱ्या सुधारणांचा नवा अध्याय सुरू झाला. कर्जपुरवठयाच्या प्रक्रिया, कर्जाच्या व्याजदराच्या पध्दतीवरचे निर्बंध उठवणे, पूर्वीच्या नियमांचे हळूहळू शिथिलीकरण, प्रचलित बँकिंग पध्दतीकडून केंद्रीय बँकिंग प्रणालीकडे स्थलांतर, नव्या युगातल्या खाजगी क्षेत्रातल्या बँकांना व्यवहाराची परवानगी, ग्राहक सेवांचा नवीन अध्याय, या सर्वांमुळे २००० च्या दशकात बँकिंग सेवांचा वेगाने विस्तार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले. यामुळे बँकांना आधुनिक तंत्राच्या मदतीने नवनवीन कल्पना राबविण्यात प्रोत्साहन मिळाले. परिणामी बँकिंगक्षमता वाढली. ग्राहकांना आर्थिक चांगल्या दर्जाच्या सेवा पुरवठयाबरोबर उत्पन्न वाढविण्यासाठीही याचा चांगला उपयोग झाला. जागतिकीकरण प्रक्रियेअंतर्गत भारताने वित्तीय क्षेत्रातील सुधारणा कर यांच्या दृष्टीने बँकिंग क्षेत्राला स्पर्धात्मक बाजारपेठेत उतरविण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. बँकिंग क्षेत्रातील आर्थिक किंवा वित्तीय सुधारणा हा जागतिकीकरण प्रक्रियेचाच एक भाग आहे. प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणानंतर बँकिंग क्षेत्र भक्कम करण्यासाठी ग्राहक सेवामध्ये बँकांनी कोणते नविन अध्याय सुरू केले आहेत जणेकरून त्यांचा बँकासमोर कोणती



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya

आव्हाने स्विकारावी लागत आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

**गृहितक :**

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर १९९१ पासून बँकिंग मधील बदल आपण रोज अनुभवतो आहोत. पूर्वी ग्राहक बँकांच्या मागे व आता बँका ग्राहकांच्यामागे असा उलट प्रवास अनुभवास येत आहे. जनतेच्या दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य अंग बनू पाहणारे बँकिंग क्षेत्र दिवसेंदिवस अधिकाधिक ग्राहकाभिमुख बनू पाहत असल्याचा अनुभव आपणस रोज येत आहे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतला आहे. भारतीय बँकिंग क्षेत्राचा १९९१ नंतर झालेल्या या विकासामध्ये ग्राहक सेवा मधील नविनीकरण अभ्यासला आहे. द्वितीय माहिती संकलनासाठी भारतीय रिझर्व्ह बँक अहवाल, बँकिंगसंबंधी विविध समित्यांचे अहवाल, विविध संशोधनपर लेख, पुस्तके इ.चा वापर केला आहे. जागतिक बँक अहवाल, नरसिंहम समिती अहवाल यामधील तरतुदींचाही विचार केला आहे. जेणेकरून बँक ग्राहक सेवात नविनीकरणात बँका यशस्वी होत आहेत. खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या अत्यंत गतिमान असलेल्या या अर्थव्यवस्थेत टिकून राहण्यासाठी फसवेगिरीच्या या तात्पुरत्या उपाय योजनांना तिलांजली देवून ग्राहकांचा विश्वास कायमस्वरुपी मिळविण्यासाठी पारदर्षक कारभार, ग्राहकसेवा क्षेत्रास प्राधान्य व ग्राहकांच्या व्यवसायामध्ये भागीदाराची भूमिका या त्रिसूत्रीचा बँका वापर करुन अधिक ग्राहकसेवा बँकाभिमुख होण्यासाठी बँकांनी नविनीकरणाचा अध्यास सुरु केलेले आहे.

**ग्राहक सेवेवा बँकींग क्षेत्रातील नविन अध्याय :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये १९९१ साली आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची सुरवात झाली. याचवर्षी नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली देशांतील बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. त्यानंतर १९९८ मध्ये नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा दुसरी समिती स्थापन करण्यात आली. या समितीने या पूर्वीच्या सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी कृषी झाली आणि यापुढे बँकिंग क्षेत्रात कोणत्या सुधारणांची गरज आहे यांचा अभ्यास केला.

या समितीला बँकिंग क्षेत्रातील सुधारणा असे संबोधले गेले. या दोन्ही समितीच्या अभ्यासामुळे आणि सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यामुळे आपल्या देशातील बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले. याचाच परिणाम म्हणून ग्राहक सेवा बँकिंग क्षेत्रातील नवीन अध्यायास सुरवात झाली.

वित्त मंत्रालय आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या संकल्पनेतील पेमेंट बँका व स्मॉल फायनांस बँका यांचा उदय २०१६-१७ मध्ये झाली. सध्यस्थितीत भारतामध्ये सरकारी व्यापारी बँका (एस.बी.आय.बँक, बँक ऑफ बडोदा) खाजगी व्यापारी बँका (उदा. आय.सी.आय.सी.बँक, एच.डी.एफ.सी.बँक) विभागीय ग्रामीण बँका (उदा. महाराष्ट्र ग्रामीण बँक), नागरी सहकारी बँका (उदा. सारस्वत बँका), विदेशी व्यापारी बँका (उदा.सिटी बँका), पेमेंट बँका (उदा. पोस्ट बँका) इ. वेगवेगळ्या बँका पाहिल्यानंतर हा प्रश्न पडणे साहजिक आहे कि इतक्या विविध प्रकारच्या बँकांची गरज काय परंतू या प्रश्नामध्यचे त्याचे उत्तर दडलेले



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya
SANGLI

आहे.

जितक्या गरजा तितक्या प्रकारच्या बँका, ग्राहकांच्या गरजा/सेवापूर्तीसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बँकांची स्थापना झाली. ग्राहकांसाठी आधुनिक सेवा या आजकालच्या बँका उपलब्ध करून देत आहेत. मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, फोन बँकिंग, एसएमएस बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, प्रीपेड कार्ड, डयूएल कार्ड, गिफ्ट कार्ड, पेट्रो कार्ड, इंजिन मशीन मधून पैसे काढणे व भरणे, टॅब्लेट बँकिंग, रुपेकार्ड, व्यापाऱ्यांना पीओएस मशीन उपलब्ध करुन देणे, व्यापाऱ्याचे पैसे दररोज जमा करण्यासाठी कर्मचारी पाठवणे, जेणेकरुन व्यापाऱ्यांना बँकेत जाण्याची गरज पडणार नाही. सर्व बँका आपले मोबाईल ॲप सुरू केले आहेत. त्यामधून सर्वांना बऱ्याच प्रकारचे व्यवहार करता येतात. उदा. भारतीय स्टेट बँकांनी नुकतेच (Artificil Intelligence) कृत्रिम बुध्दीमत्ता असलेली सेवा सुरु केली आहे. हे एक तत्रज्ञान आहे. जे स्वत: ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देते. BHIM (भारत इंटसोस फॉर मनी) हे नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ने तयार केलेले मोबाईल ॲप आहे. याचा वापर करुन आपण एकदम सोप्या पध्दतीने पैशाची ऑनलाईन देवाण–घेवाण करु शकतो.

**नॅशनल पेमेंटेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) :-**

बँकांना त्यांच्या ग्राहकांना चांगल्या प्रकारच्या सेवा पुरविता याव्या म्हणून भारतीय रिझर्व्ह बँक आणि इंडियन बँक असोसिएशन (IBA) यांच्या पुढाकाराने नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ची स्थापना Payment and Settlement Act 2007 च्या कायद्यानुसार करण्यात आली. दहा बँका नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या प्रवर्तक बॅक आहेत. एसबीआय, पीएबी, कॅनरा बॅक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, सिटी बँक आणि एचएसबीसी बँका या दहा बँकांचा समावेश आहे.

BCSBI बँकिंग कोड ॲण्ड स्टॅण्डर्ड बोर्ड ऑफ इंडिया : नोव्हेंबर २००३ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने श्री. एस.एस. तारापोरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीचे उदिष्ट्य हे सामान्य व्यक्तीला पूरेशा बँक सेवा कशा उपलब्ध करुन देता येतील हे होते. या समितीच्या शिफारशीच्या आधारावर BCSBI या संस्थेची स्थापना फेब्रुवारी २००६ मध्ये झाली. सर्व शेडयुल्ड कमर्शियल बँका, ग्रामीण बँका व नागरी सहकारी बँका याच्या सदस्य आहेत.

**बँकिंग कोड ॲण्ड स्टॅण्डर्ड बोर्ड ऑफ इंडिया या संस्थेची मुख्य उद्दिष्ट्ये (BCSBI) :-**

१. बँक ग्राहकांना सर्व सोयी सुविधां योग्य पध्दतीने उपलब्ध करुन देण्यासाठी एक Comprehesive codes and Standard तयार करणे.
२. सर्व बँका या Codes and Standards चे नियमित पालन करत आहेत किंवा नाही यावर लक्ष ठेवणे.
३. BSCBI आणि IBA ने मिळून दोन कोड तयार केले आहेत.
४. Code of Bank's Commitment of Customers.
५. Code of Bank's Commitment of Customer भारतीय रिझर्व्ह बँकेने ग्राहकांसाठी आतापर्यंत अनेक समित्यांचे गठन केल आहे. त्यामध्ये सन १९७५ तलवार समिती, सन १९९० गोईपोरीया,

SANGLI
Principal,
Kanya Mahavidyalaya

२००४ तारापोरे समिती, २००६ सदाशिव वकौंग ग्रुप, २०११ दामोदरन समिती या सर्व समित्या ग्राहकसेवा वाढविण्यासाठी शिफारशी केल्या आहेत.

**प्रधानमंत्री जनधन योजना :** देशातल्या प्रत्येक घरापर्यंत सेवा पोहचून बँक खाते उघडले जावे यांसाठी विद्यमान पंतप्रधानांनी कार्यभार स्विकारल्यानंतरच्या काळात स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १५ ऑगस्ट २०१४ ला केलेल्या भाषणात आर्थिक समावेशनसाठी विशेष प्रयत्नांची गरज असल्याचे अधोरेखित केले. त्याचाच एक भाग म्हणून देशातल्या घराघरात बँकिंग सेवा पोहचविण्यासाठी तसेच प्रत्येक घरातल्या किमान एका व्यक्तीचे बँक खाते सुरु करण्यासाठी शासनाने सर्वांना बँकिंग व्यवस्थेत प्रवेश देणारी प्रधानमंत्री जनधन योजना सुरु केली.

**तक्ता क्र. १**

प्रधानमंत्री जनधन योजना (६ डिसेंबर २०१७ पर्यंत, आकडे–कोटीमध्ये)

| बँकेचे नांव/प्रकार | लाभार्थ्यांची संख्या | | | खात्यामध्ये जमा रकमा (रु.कोटीमध्ये) | लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रुपेकार्डची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | | |
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | १३.३ | ११.५ | २४.८ | ५५६४६.६ | १८.६ |
| प्रादेषिक ग्रामीण बँका | ४.२ | ०.८ | ४.९ | १२०३३.९ | ३.६ |
| खाजगी क्षेत्रातील बँका | ०.६ | ०.४ | १.० | २१६०.६ | ०.९ |
| एकूण | १८.१ | १२.७ | ३०.७ | ६९८४१.२ | २३.१ |

स्त्रोत: भारत सरकार http://pmjdy.gov.in.account.

वरील तक्त्यानुसार ६ डिसेंबर २०१७ पर्यंत उपलब्ध आकडेवारी नुसार या योजनेअंतर्गत ३०.७ कोटी खाती उघडली गेली असून त्यापैकी १८.१ कोटी खाती ग्रामीण भागात तर १२.७ कोटी खाती शहरी भागात उघडली गेली आहेत. रूपेकार्डची संख्याही २३.१ कोटीपर्यंत वाढली आहे. ६ डिसेंबर पर्यंत बँकामध्ये या खात्यात जमा झालेल्या ६९८४१.२ कोटी रुपये ही आकडेवारी लक्षात घेतली तर या योजनेमधून बँकांनी ग्राहकांसाठी दिलेली सेवा उत्तम असल्याचे निदर्शनास येते.

**नवनवीन उपक्रम :** बँकसेवा नसलेल्या लोकवस्तीत पोहचण्यासाठी व्यावसायिक बँकांनी नवनवीन उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये मोबाईल गाड्या, जागोजागी तात्पूरते तंबू उभारुन बँक सेवा लोकांपर्यंत पोहचवणे अशा उपक्रमांचा समावेश आहे. आजही अनेक खातेधारक आहेत ज्यांनी बँकेंच्या शाखेत प्रवेश केलेला नाही. बीसी (बँकिंग प्रतिनिधी) सेवेमार्फत त्यांचे सगळे बँकिंग व्यवहार करुन बँकिंग क्षेत्रात त्यांना सामावून घेण्याचा बँकांचा प्रयत्न सुरु आहे. बीसी सुविधेमुळे केवळ बँकिंग व्यवहार सोपे झाले नाहीत तर ग्राहकांना त्यांच्या घराजवळ बँकिंग सेवा घेण्याची सवय लागली आहे. बँकिंग व्यवहारावर त्यांना मोठी सवलतही देण्यात आली. यामुळे ग्राहकांना शाखेमध्ये जावून दिवसाचा पगार बुडवून



SMT. MATHUBAI GARWARE KANYA MAHAVIDYALAYA SANGLI
Principal,
S.M.G. Kanya Mahavidyalaya

बँकेचे काम करण्याची गरज नाही. त्यांचे व्यवहार त्यांच्या परिसरात पूर्ण होवू शकतात. बीसी सुविधेसह बँक सेवा मिळाली तर ग्राहक त्याचा वापर करु शकतात. झोपडपट्टी बँक सेवा नसलेल्या इतर भागात या सुविधेसह बँकिंग क्षेत्र पोहचले आहे. तसेच व्यावसायिक बँकांनी आतापर्यंत आपले कार्यक्षेत्र विस्तारत बीसी (बँकिंग प्रतिनिधी) सुविधाच्या माध्यमातून सहा लाख गावापर्यंत बँकिंग सेवा पोहचली आहे.

**तक्ता क्र. २**

**बँक समूह २०१७ पर्यंत बँक शाखांची संख्या**

| बँकेचे प्रकार | ग्रामीण | निमशहरी | शहरी | महानगरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ सहयोगी बँका | ८०२९ | ६५९३ | ४३०४ | ३६२२ | २२५४८ |
| राष्ट्रीयीकृत बँका | २१६०५ | १६९५३ | १३०८३ | ११७०३ | ६३३४७ |
| प्रादेशिक बँका | १४६१३ | ३७४८ | १०७१ | २२८ | १९६६० |
| खाजगी क्षेत्रातील बँका | ४३०२ | ६४५७ | ४५२१ | ४६९८ | १९९७८ |
| परदेशी बँका | ८ | १२ | ५७ | २४७ | ३२४ |
| **एकूण** | **४८५५७** | **३३७६६** | **२३०३६** | **२०४९८** | **१२५८५७** |

